# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## (सचिवालय)

**प्रस्तावना :-** नागपूर महानगरपालिका अंतर्गत झोन क्र. ०२, ०८ आणि १०
**{ प्रकल्प विभाग-१}** मधील विविध नाल्यांवर लोखंडी जाळया लावण्याचे कामाकरीता बोलावण्यात आलेल्या निविदेतील M/s Prajana Group यांनी २९.५१ % कमी दराच्या निविदेला मा.आयुक्त मनपा नागपूर यांनी दि.०८.०९.२०२५ रोजी मंजुरी प्रदान केलेली आहे.

सबब कामाकरिता M/s Prajana Group यांना करावयाच्या कामाचे रु. ६४,४७,०९५/- (Including GST) रांशीचा कार्यादेश निर्गमित करण्याचा प्रश्न विचारात घेण्यास्तव मा.प्रशासक यांचे मान्यतेस्तव सादर.

**टिप :-**

१. प्रस्तुत कामाकरीता नागपूर महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाच्या पदशिर्ष क्र. A४२४००१२२०३०१ या मधुन करण्यात येईल.
२. सदर कामाकरिता मा. अधिक्षक अभियंता यांची रु. ९०,२७,११२/- राशीला दि. २४.०३.२०२५ रोजीची तांत्रिक मंजुरी प्राप्त आहे.
३. विस्तृत टिपणी नस्तीत संलग्न आहे.

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक :- 279/स्थायी समिती/प्रशासक** **दिनांक :- 16/09/2025**

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार कार्यकारी अभियंता (प्रकल्प-१), प्रकल्प विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार नागपूर महानगरपालिका अंतर्गत झोन क्र. ०२, ०८ आणि १० मधील विविध नाल्यांवर लोखंडी जाळया लावण्याचे कामाकरीता बोलावण्यात आलेल्या निविदेतील M/s Prajana Group यांनी २९.५१ % कमी दराच्या निविदेला मा. आयुक्त मनपा नागपूर यांनी दि.०८.०९.२०२५ रोजी मंजुरी प्रदान केलेली आहे.

सबब कामाकरिता M/s Prajana Group यांना करावयाच्या कामाचे रु. ६४,४७,०९५/- (Including GST) रांशीचा कार्यादेश निर्गमित करण्याच्या प्रस्तावास मा. प्रशासक यांनी मंजुरी प्रदान केली.